श्री. राजेंद्र मदने, परिवहन उप आयुक्त (कनिष्ठ श्रेणी) यांची अतिरिक्त महाव्यवस्थापक, बेस्ट सार्वजनिक उपक्रम या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांकः एमव्हीडी-०७१९/प्र.क्र.१८०/परि-४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
२ रा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत)
दिनांक: १६ सप्टेंबर २०१९

वाचा-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्या-१२, दि. १७.१२.२०१६

२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. एमव्हीडी-०११६/प्र.क्र.३०/परि-४, दि. ३१.०८.२०१७.

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या-१२, दि. १६.०२.२०१८.

४) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. एमजीसी/ए/९१७४, दि. १०.०७.२०१९

५) श्री. राजेंद्र मदने, परिवहन उप आयुक्त (क. श्रे.) यांचा अर्ज दि.०४.०९.२०१९

प्रस्तावना -

श्री. राजेंद्र मदने, यांना दि. ३१.०८.२०१७ रोजीच्या संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये प्रादेशिक परिवहन अधिकारी (सहावा वेतन आयोग-वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० +ग्रेड पे ६६००) (सातवा वेतन आयोग- एस-२३-६७७००-२०८७००) या पदावर पदोन्नती देण्यात आली असून श्री. मदने हे परिवहन आयुक्त कार्यालयामधील परिवहन उप आयुक्त (क. श्रे.) या पदावर कार्यरत आहेत. आयुक्त बृहन्मुंबई महानगर पालिका यांनी दि. १०.०७.२०१९ रोजीच्या संदर्भ क्र. ४ वरील पत्रान्वये श्री. राजेंद्र मदने यांना बेस्ट या सार्वजनिक उपक्रमाच्या अतिरिक्त महाव्यवस्थापक या पदावर एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याची विनंती केली आहे. तसेच सदर पदावरील प्रतिनियुक्तीस त्यांची हरकत नसल्याचे श्री. मदने यांनी संदर्भ क्र.५ येथील अर्जान्वये कळविले आहे. त्यानुषंगाने, श्री. राजेंद्र मदने यांना अतिरिक्त महाव्यवस्थापक, बेस्ट सार्वजनिक उपक्रम या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. २ व ४ वरील अनुक्रमे दि. १७.१२.२०१६ व दि. १६.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्ती धोरणातील तरतूदी, आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी केलेली विनंती तसेच सदर प्रतिनियुक्तीस नगरविकास विभागाने दिलेली ना हरकत विचारात घेता, श्री. राजेंद्र मदने, परिवहन उप आयुक्त (क.श्रे.) यांची महाराष्ट्र

नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट-दोन) मधील विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून अतिरिक्त महाव्यवस्थापक, बेस्ट सार्वजनिक उपक्रम या पदावर आदेशाच्या दिनांका पासून प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. श्री. राजेंद्र मदने, परिवहन उप आयुक्त (क.श्रे.) यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी गृह (परिवहन) विभाग मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत हाताळण्यात येतील.

३. अतिरिक्त महाव्यवस्थापक, बेस्ट सार्वजनिक उपक्रम या पदावर प्रतिनियुक्तीने रुजु होण्यासाठी श्री. राजेंद्र मदने यांच्या सेवा प्रधान सचिव (नगर विकास-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

४. श्री. राजेंद्र मदने, परिवहन उप आयुक्त (क.श्रे,) यांनी पुढील सूचनांसाठी प्रधान सचिव (नगर विकास-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे हजर व्हावे.

५. श्री. राजेंद्र मदने, परिवहन उप आयुक्त (क. श्रे.) यांना अतिरिक्त महाव्यवस्थापक, बेस्ट सार्वजनिक उपक्रम या पदावर रुजु होणेसाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.

६. सदर शासन निर्णय नगर विकास विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. अनौस-२०१९/सं.क्र.७८/नवि-२१, दि.२९.०८.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०९१६१५५३४६८२२९** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KADAM DATTATRAY HANMANT

Digitally signed by KADAM DATTATRAY HANMANT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=cf316337e92d3c54da432222208093bfc6ed1d1570f094663515273d0b4d27fc, postalCode=400032, street=HOME DEP.MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a923979cf886d5724fbed87cd57745c3f72eba57b0d277f11e970f0aaca99802, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KADAM DATTATRAY HANMANT
Date: 2019.09.16 18:42:26 +05'30'

(द.ह.कदम)

अवर सचिव, गृह (परिवहन) विभाग

प्रति,

१) प्रधान सचिव (नगर विकास-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई.

३) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रतिलिपी,

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

२) मा. मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

३) मा. राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

४) प्रधान सचिव (परिवहन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

५) उप सचिव (परिवहन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

६) प्रधान महालेखाकार-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर.

७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

८) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.

९) श्री. राजेंद्र मदने, परिवहन उप आयुक्त (क. श्रे.), परिवहन आयुक्त कार्यालय.

१०) निवडनस्ती (परिवहन-४)